# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० E-mail Id – coegondwana@gmail.com

जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/2427/२०१७ दि.१८/०७/२०१७

## प्रवेशासंबंधी सुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थी तसेच संबंधीतांना सुचित करण्यात येते की, पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमच्या प्रवेशासंबंधी विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१७–१८ चे **Academic Calender** संदर्भ क्रं. **No./GUG/ACAD/A.C./७५/२०१७, दिनांक २९/०४/२०१७** नुसार विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेश घेण्याची प्रक्रिया संगणकीय **Online** प्रणालीद्वारे **www.unigug.org** या **Link** वर उपलब्ध करण्यात येत असून प्रथम सेमीस्टर करीता पहिल्या टप्प्यातील प्रवेश देण्याची प्रक्रिया दिनांक ०१ ऑगस्ट २०१७ पर्यंत पूर्ण करावे.

## प्रवेशाकरीता महाविद्यालयांना आवश्यक सुचना

१) प्रथम सेमीस्टर करीता प्रवेश देत असतांना विद्यार्थ्यानी अभ्यासक्रम निहाय अचूक विषय निवडलेले आहेत किंवा नाही याची खात्री करावी.

२) विद्यार्थी/विद्यार्थीनीचे पूर्ण नाव, (इंग्रजी व मराठी) आईचे नाव, जन्म तारीख, मतदार नोंदणी क्रमांक, आधार क्रमांक ,जात, लिंग, माध्यम, मोंबाईल नंबर व पत्ता, याची अचूक नोंद करावी.

३) सेमीस्टरची निवड तसेच शैक्षणिक वर्ष अचुक नोंदवावे.

४) पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता इतर विद्यापीठाचे स्थानांतरण प्रमाणपत्र व या विद्यापीठाचे योग्यता प्रमाणपत्र स्विकारून व पडताळणी करूनच विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात यावा.

५) अभ्यासक्रमानुसार मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील.

६) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव प्रवेश रदद् करावयाचा असल्यास विनंती अर्ज प्राचार्यामार्फत सादर करून विद्यापीठाकडून प्रवेश रदद् करून घ्यावा.

७) विद्यापीठाच्या निर्देश (Direction),परीपत्रके, अधिसूचना) नूसारच आवश्यक कागदपत्राची (Documents) तपासणी करून नियमानुसार अभ्यासक्रमामध्ये प्रवेश देण्यात यावे.चुकीचे प्रवेश देण्यात आल्यास नामांकन केल्या जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

८) विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व ज्या विद्यार्थ्यांना **१/१/२०१७** रोजी वयाचे १८ वर्षे पुर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांला मतदान कार्ड ची सत्यप्रत घेणे अनिवार्य राहील. तसेच आधार कार्ड व मतदान कार्ड ची सत्यप्रत नामांकनाच्या वेळेला नामांकन अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.(परंतू काही विद्यार्थ्याकडे आधार कार्ड व मतदान नोंदणी क्रमांक नसल्यास अशा विद्यार्थ्यांकडुन आवश्यक हमीपत्र भरुन घ्यावे व फार्म नंबर ६ चा उपयोग मतदान नोंदणीकरीता संबधित विभागाकडे देण्यात यावा व एका महीण्याच्या आत सदर बाब पूर्ण करुन विद्यापीठात सादर करावे)

( डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली